# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 20/05/2020 (बुधवार)
(दुपार)

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 13 कि. मी. अंतरावर मोहपा वार्ड क्र. 10 येथे दिनांक 13/05/2020 चे 21.30 वा. दरम्यान पोर्णिमा युवराज शिरसागर, वय 51 वर्ष, रा. मोहपा या दिनांक 12/05/2020 ची शिळी खिचडी दि. 13/05/2020 रोजी खाल्यामूळे त्यांची प्रकृती अचानक खराब झाली. त्यांना उपचारकामी प्रथम पीएचसी मोहपा व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता दि. 17/05/2020 रोजी 10:00 वा त्यांचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विकास बेलसरे, मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार लक्ष्मण रूडे हे करीत आहे.

2) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावर मौजा ईटगाव फाटा येथे दिनांक 04/05/2020 चे 14.30 वा. दरम्यान सौ. रोशनी आकाश ईवनाते, वय 21 वर्ष, रा. अंगाझारी हि तिच्या पती सोबत एमएच–40/ए–9053 क्रमांकाच्या मोटरसायकल वर डबल सिट बसुन खापरखेडा वरून अंबाझरी गावी जात होती. दम्यान ईटगाव फाटया जवळ मोटरसायकलच्या मागे बसलेली रोशनी ईवनाते हिची साडी मोटरसायकलच्या चाकात अटकल्याने ती खाली पडुन जखमी झाली. तिला उपचारकामी प्रथम पीएचसी ग्रामीण रूग्णालय पारशिवनी व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता तिचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विकास बेलसरे, मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा नरेश रामटेके 9890100715 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर